VLC EXT

(12)

# अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे नागरी संकुलन, ठाणे.

जिल्हाधिकारी कार्यालय, दालन क्र. २७, दुसरा मजला, कोर्ट नाका, ठाणे (प) - ४०० ६०१.
दूरध्वनि क्र. ०२२-२५३४९२

क्र. युएलसी/टिए/एटीपी/कलम २०/मुदतवाढ/डिमांड नोटीस/एसआर-१४८२/४७० दिनांक - ६ ऑक्टोबर, २०१५.

प्रति,
श्रीमती येसूबाई यशवंत म्हात्रे (जमीनधारक)
द्वारा -श्री. गोपालजी के. द्विवेदी (अधिकारपत्रधारक)
इंद्रलोक कॉम्प्लेक्स, इलेक्ट्रीक पोल,
नवघर, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे.

विषय -नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम, १९७६ चे कलम २० खालील गृहनिर्माण योजनेची अंमलबजावणी करण्यास मुदतवाढ देण्याबाबत व इतर बाबीं....
[मौजे नवघर, ता.जि. ठाणे, जूना सर्व्हे क्र. २१९/१४ (नविन सर्व्हे क्र. १९३/१४), जूना सर्व्हे क्र. २२७/१, (नविन सर्व्हे क्र. २८/१) व जूना सर्व्हे क्र. २२०/११ (नविन सर्व्हे क्र. १९२/११), क्षेत्र ७८७.०० चौ.मी.]
(योजना क्र. एसआर-१४८२)

संदर्भ -१) योजनाधारक यांचा विनंती अर्ज दि. १४.०९.२०१५.
२) शासन निर्णय क्र. मुदत २०१४/प्र.क्र.५९/नाजकधा-२, दि. १८.०२.२०१५.

उपरोक्त विषयाबाबत, योजनाधारक यांनी संदर्भिय ०१ येथील पत्रान्वये या कार्यालयाकडे, मौजे नवघर, ता.जि. ठाणे, जूना सर्व्हे क्र. २१९/१४ (नविन सर्व्हे क्र. १९३/१४), जूना सर्व्हे क्र. २२७/१, (नविन सर्व्हे क्र. २८/१) व जूना सर्व्हे क्र. २२०/११ (नविन सर्व्हे क्र. १९२/११), क्षेत्र ७८७.०० चौ.मी. क्षेत्राच्या योजनेस मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रथमत: मुदतवाढ दंड तसेच प्रगती अहवाल दंड भरणा होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी, संदर्भिय २ येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने, मौजे नवघर, ता.जि. ठाणे, जूना सर्व्हे क्र. २१९/१४ (नविन सर्व्हे क्र. १९३/१४), जूना सर्व्हे क्र. २२७/१, (नविन सर्व्हे क्र. २८/१) व जूना सर्व्हे क्र. २२०/११ (नविन सर्व्हे क्र. १९२/११), क्षेत्र ७८७.०० चौ.मी. क्षेत्राकरिता दि. २४ सप्टेंबर, २००७ ते दि. २३ सप्टेंबर, २००८ (विनादंडात्मक) व दि. २४ सप्टेंबर, २००८ ते दि. २३ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत (एकुण ८ वर्ष १ महिने) मुंदतवाढ देणेबाबत, प्रतिवर्षे रु. १०/प्रति चौ.फुट या दराने मुंदतवाढ दंड रु. ६,८४,७३५/- परिगणित करण्यात आला आहे. तर प्रगती अहवालाबाबत, प्रतिसहामाही रु. २.५०/प्रति चौ.फुट या दराने एकुण दंड रु. ३,३८,८५५/- परिगणित करण्यात आला आहे. तरी, योजना मुदतवाढ दंड रु. ६,८४,७३५/- (अक्षरी रुपये सहा लक्ष चौऱ्याऐंशी सहस्त्र सातशे पस्तीस मात्र)व प्रगती अहवाल दंड रु. ३,३८,८५५/- (अक्षरी रुपये तीन लक्ष अडतीस सहस्त्र आठशे पंचावन मात्र), प्रस्तुत पत्राच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत भरणा करावा.

(signature) ६/१०
अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
ठाणे नागरी संकुलन,ठाणे.

त -निवडनस्ती

Desk/Mudarvad-5]

IOD

(13)

2 N.A.1307(Legal)

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे- ४०१ १०१

जा.क्र.मिभा/मनपा/नर/१३६९/२०१३-१४ दिनांक- २३/७/१३

प्रति,
जमीन/जागामालक - मे. इंद्रलोक डेव्हलपर्सचे भागीदार तर्फे अन्नपूर्णा बिल्डकॉन इन्फ्रा प्रा.लि. यांचे संचालक श्री. गोपालजी के. द्विवेदी व श्री. नविन डी. पाटील
अधिकार पत्रधारक - श्री. नविन डी. पाटील
द्वारा- वास्तुविशारद - मेसर्स डी.एन. पटेल ॲन्ड असो.

विषय- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे – नवघर
सर्वे क्र./ हिस्सा क्र. नविन २८/१ जुना २२७/१
या जागेत नियोजित बांधकाम करण्यासाठी जागेस अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांना सादर करणेसाठी नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ-
१. आपला दि.१४/०२/२०१३ चा अर्ज व दि.१९/०७/२०१३ रोजीचे हमीपत्र.
२. मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टी.ए/एटीपी/डब्ल्यू.एस.एच.एस.-२०/एस.आर-१४८२, दि.२४/०९/२००४ ची मंजुरी.
३. अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/३३८/२०१३-१४, दि.१४/०५/२०१३ अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला.
४. दीं इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील पत्र क्र. ईआय/एनओसी/६३१/डीआरसी /२०११, दि.२८/०९/२०११.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील मौजे – नवघर सर्वे.क्र./हिस्सा.क्र. नविन २८/१ जुना २२७/१ मधील जागेस अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावयाच्या नकाशास खालील अटीस अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) विषयांकित जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून अकृषिक परवानगी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ (प्रकरण १२ सह) विहीत नमुन्यात बांधकाम प्रारंभपत्रासाठी अर्ज करण्याची व बांधकाम प्रारंभपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी आपणांवर राहील. सदर नाहरकत दाखल्याची मुदत एक वर्षासाठी आहे. सदर नाहरकत दाखल्याच्या आधारे जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही, अन्यथा बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनाधिकृत ठरवुन विहीत कार्यवाही करण्यात येईल. तसेच बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी विद्युतपुरवठा करणेबाबत महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

२) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.३१/१०/२०१२ रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

३) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी पोहोंच रस्ता विकसीत केल्याबाबतचा दाखला, सांडपाणी व्यवस्थाबाबतचा नाहरकत दाखला, पाणीपुरवठासाठी जल वाहिनी व्यवस्थाबाबतचा नाहरकत दाखला, उद्यान व वृक्ष प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे आवश्यक आहे. तसेच परवानगी अपेक्षिलेल्या भूखंडातून नैसर्गिक नाला असेल तर आपण सदर नैसर्गिक नाल्याचे बांधकाम करुन देणे आपणावर बंधनकारक राहिल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
१) मा. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे
नागरी संकुलन, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
२) प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.